मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# महापालिकेचे 'सावली' केंद्र राज्यात सर्वोत्कृष्ट

## 'सावली' बेघर निवारा केंद्र शहरातील गरजू, बेघर व असहाय नागरिकांसाठी आधार

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेने दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानांतर्गत सुरू केलेले 'सावली' बेघर निवारा केंद्र शहरातील गरजू, बेघर व असहाय नागरिकांसाठी आधार बनले आहे. राज्यस्तरीय निवारा संनियंत्रण समितीने केलेल्या निरीक्षणामध्ये हे केंद्र राज्यामध्ये सर्वोत्कृष्ट ठरले आहे. या केंद्रातून १६५ व्यक्तींना रोजगारही उपलब्ध करून देण्यात आला आहे.



राज्य शासनाने निवारा केंद्रावर नियंत्रण ठेवण्यासाठी राज्यस्तरीय निवारा संनियंत्रण समिती स्थापन केली आहे. या समितीने त्रयस्थ संस्थेद्वारे राज्याच्या विविध शहरांत असणाऱ्या निवाऱ्यांचे निरीक्षण करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार त्रिशरण एनलायन्मेंट फाउंडेशन या संस्थेने निवारा केंद्रांचे निरीक्षण केले. त्यामध्ये पिंपरीतील सावली बेघर निवारा हे केंद्र प्रथम क्रमांकावर आहे.

महापालिकेने २०१९ मध्ये त्रयस्थ संस्थेमार्फत केलेल्या सर्वेक्षणात शहरात १५२ बेघर आढळून आले होते. त्यांच्यासाठी दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानांतर्गत ऑक्टोबर २०२० मध्ये सावली निवारा केंद्र सुरू करण्यात आले आहे.

पिंपरी भाजी मंडईच्या पहिल्या मजल्यावर १९ हजार ८६ चौरस फूट जागेवर हे केंद्र असून, निवास क्षमता १११ व्यक्तींपर्यंत आहे. या केंद्रात पुरुष, महिला, बेघर कुटुंबे आणि अपंग व्यक्तींकरिता स्वतंत्र व्यवस्था व सुरक्षित सोयी पुरविल्या आहेत. येथे २३ खोल्या असून, बेघर कुटुंबांसाठी सात खोल्या उपलब्ध आहेत. केंद्राचे व्यवस्थापन 'रिअल लाइफ रिअल पीपल' या सामाजिक संस्थेमार्फत केले जाते. ही संस्था दर आठवड्याला शहरातील रेल्वे स्थानक, बसस्थानक, उड्डाणपूल, धार्मिक स्थळे, मेट्रो स्थानके इत्यादी ठिकाणी गस्त घालून बेघर व्यक्तींचे सर्वेक्षण करते. समुपदेशनाद्वारे त्या व्यक्तींना निवारा केंद्रात आणण्याचे काम केले जात असल्याचे सहायक आयुक्त तानाजी नरळे यांनी सांगितले.

### 165 जणांना रोजगार

» बेघर व्यक्तींचे पुनर्वसनदेखील केंद्रामार्फत केले जाते. आर्थिक वर्ष २०२०-२१ पासून आतापर्यंत ३१२ व्यक्तींचे त्यांच्या मूळ घरी किंवा नातेवाइकांकडे पुनर्वसन करण्यात आले आहे. ५० व्यक्तींना पुनर्वसन करण्यासाठी इतर संस्थेकडे पाठवण्यात आले आहे, तर १६५ व्यक्तींना रोजगार उपलब्ध करून देण्यात आल्याचे रिअल लाइफ रिअल पीपल संस्थेचे अध्यक्ष एम. ए. हुसैन यांनी सांगितले.

"'सावली' निवारा केंद्र हे केवळ गरजू व बेघरांसाठी निवासाचे ठिकाण न राहता त्यांच्या सशक्तीकरणासाठी कार्य करणारे प्रेरणादायी केंद्र बनले आहे. हे केंद्र राज्यातील सर्वोत्कृष्ट ठरले असून, येथे येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला चांगल्या सुविधा दिल्या जात आहेत.

**- शेखर सिंह, आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका.**

# फरार राजेंद्र आणि सुशील हगवणेंना अखेर अटक

## पहाटे साडेपाचच्या सुमारास अटक : पिंपरी- चिंचवड पोलिसांनी मुसक्या आवळल्या

**पिंपरी | प्रतिनिधी**

वैष्णवी आत्महत्या प्रकरणी अखेर पिंपरी-चिंचवड पोलिसांनी सासरे राजेंद्र हगवणे आणि त्यांचा मुलगा सुशील हगवणेला स्वारगेट मधून अटक केली आहे. सात दिवसांपासून त्यांचा शोध सुरू होता. या प्रकरणामुळे अवघ राजकारण तापलं होतं. अखेर त्यांच्या पिंपरी- चिंचवड पोलिसांनी मुसक्या आवळल्या आहेत. पहाटे साडेपाचच्या सुमारास त्यांना अटक करण्यात आली आहे.



गेल्या आठवड्यात राजेंद्र हगवणे यांची सून वैष्णवी हगवणे यांनी गळफास घेऊन आत्महत्या केली होती. त्या दिवसापासून राजेंद्र हगवणे आणि त्यांचा मुलगा सुशीला हगवणे हे फरार होते. पती शशांक, सासू लता आणि नणंद करिष्मा यांना आधीच पोलिसांनी अटक केलेली आहे. त्यांना २६ मे पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आलेली आहे.

काल दिवसभर राजकीय नेत्यांनी कस्पटे कुटुंबाची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केलं. लवकरात लवकर आरोपींना अटक करण्यात येईल अस आश्वासन दिलं होतं. पोलिसांची सहा पथक आरोपींचा शोध घेत होते. अखेर त्यांना स्वारगेटमधून बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. अजित पवार यांनी देखील फोन द्वारे कस्पटे कुटुंबीयांशी संवाद साधत त्यांना धीर दिला होता. आरोपींना लवकरच अटक करण्यात येईल अस आश्वासन दिले होते.

# पुण्यात 'हेरिटेज वॉक' पुन्हा सुरू करणार

## प्रस्तावाला स्थायी समितीमार्फत मुख्य सभेने मंजुरी दिल्याने हा उपक्रम सुरू होणार

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील ऐतिहासिक वास्तूंची माहिती पर्यटनासाठी पुण्यात येणाऱ्या पर्यटकांना व्हावी, यासाठी काही वर्षांपूर्वी महापालिकेच्या दुर्लक्षामुळे बंद पडलेला 'हेरिटेज वॉक' पुन्हा सुरू करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. या प्रस्तावाला स्थायी समितीमार्फत मुख्य सभेने मंजुरी दिल्याने पुढील काही दिवसांत हा उपक्रम सुरू होणार आहे.

पुणे शहराला ऐतिहासिक वारसा आहे. शहरात शनिवार वाडा, लाल महाल, विश्रामबाग वाडा, कसबा गणपती यासह अनेक जुन्या वास्तू आहेत. शहरात पर्यटनासाठी येणाऱ्यांना या वास्तूंबाबत उत्सुकता असते. पुणे शहराचा वारसा नागरिकांना समजावा, यासाठी पुणे महापालिका आणि जनवाणी या संस्थेने 'हेरिटेज वॉक' हा उपक्रम २०१२ मध्ये सुरू केला होता. सुरुवातीची दोन वर्षे या उपक्रमाला मोठा प्रतिसाद मिळत होता. या उपक्रमात शहरातील १५ ऐतिहासिक वास्तूंची माहिती तज्ज्ञ आणि अभ्यासकांकडून दिली जात होती. यामध्ये शनिवारवाडा, भिडे वाडा ते विश्रामबाग वाडा यांचा समावेश होता. या उपक्रमाकडे महापालिकेने लक्ष न देत त्यामध्ये सातत्य न ठेवल्याने कालांतराने हा उपक्रम बंद पडला.

दोन वर्षांपूर्वी प्रायोगिक तत्त्वावर 'हेरिटेज वॉक'चा उपक्रम वर्षभरासाठी पुन्हा सुरू करण्यात आला होता. प्रत्येक शनिवारी आणि रविवारी सकाळी हा उपक्रम घेतला जात होता. याला नागरिकांकडून चांगला प्रतिसाद मिळत होता. त्यानंतर आता खासगी पद्धतीने हेरिटेज वॉक उपक्रम राबविणाऱ्या अजित आपटे यांनी हा उपक्रम पुन्हा सुरू करण्यासाठी महापालिकेकडे प्रस्ताव दिला होता. त्यानंतर महापालिका प्रशासनाने हा प्रस्ताव तयार करून स्थायी समितीसमोर मान्यतेसाठी ठेवला होता.

स्थायी समितीच्या बैठकीत हा प्रस्ताव दाखल मान्य करण्यात आला. त्यानंतर महापालिकेच्या सर्वसाधारण सभेतही हा विषय मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. महापालिका आयुक्त आणि प्रशासक डॉ. राजेंद्र भोसले यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सर्वसाधारण सभेत या विषयाला मान्यता देण्यात आली. सर्वसाधारण सभेने त्याला मान्यता दिल्याने आता पुढील काही दिवसांत हा उपक्रम सुरू केला जाणार असून, याद्वारे नागरिकांना आणि पर्यटकांना शहराचा इतिहास, तसेच ऐतिहासिक स्थळे, वारसा यांची माहिती मिळणार आहे.



### शनिवार, रविवारी 'हेरिटेज वॉक'

» महापालिकेने हेरिटेज वॉकच्या प्रस्तावाला मान्यता दिल्याने आठवड्यातून दोन दिवस शनिवार आणि रविवारी सकाळी सात ते साडेनऊ या वेळेत हा 'हेरिटेज वॉक' होणार आहे. यामध्ये पर्यटकांना छत्रपती शिवाजी महाराज पूल, घोरपडे घाट, शनिवार वाडा, कसबा गणपती मंदिर, लाल महाल, भिडे वाडा, बेलबाग मंदिर, पुणे नगरवाचन मंदिर, तुळशीबाग, महात्मा फुले मंडई, विश्रामबाग वाडा ही ठिकाणे दाखविली जाणार आहेत. सर्वसाधारणपणे अडीच किलोमीटरचा हा वॉक असणार आहे.

---

# 3 महिन्यात 'पीएमपी'चे 3 लाख प्रवासी वाढविण्याचे उद्दिष्ट

## सध्या 'पीएमपी'तून सुमारे साडेबारा लाख प्रवासी रोजचा प्रवास करतात

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या (पीएमपीएमएल) बसमधील प्रवाशांची संख्या पुढील तीन महिन्यांत प्रतिदिवस १५ लाखांपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट 'पीएमपी' प्रशासनाने निश्चित केले आहे. सध्या 'पीएमपी'तून सुमारे साडेबारा लाख प्रवासी रोजचा प्रवास करतात. या उद्दिष्टपूर्तीसाठी 'आपली सेवा, आपली जबाबदारी' या धोरणानुसार 'पीएमपी'च्या व्यवस्थापक संचालक तथा अध्यक्षा दीपा मुधोळ-मुंडे यांनी स्वत: पीएमपीतून प्रवास करून त्रुटी जाणून घेऊन मार्गिकाविस्तार, नवीन मार्गिका आणि अमलात असलेल्या सेवांची दुरुस्ती करण्यास सुरुवात केली आहे.

सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेची 'जीवनवाहिनी' असलेल्या 'पीएमपी'तून पुणे, पिंपरी-चिंचवड शहरासह, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीएच्या) हद्दीमध्ये २०२२-२३ पर्यंत प्रतिदिन साडेदहा लाख प्रवासी प्रवास करीत होते. सध्या हा आकडा साडेबारा लाखांपर्यंत गेला आहे. प्रवाशांना अधिकाधिक सेवा देऊन 'पीएमपी'ला सक्षम करण्यासाठी उपाययोजनांची काटेकोर अंमलबजावणी करण्यात येत आहे.

"पीएमपी'च्या ताफ्यात नव्याने एक हजार पर्यावरणपूरक बस दाखल करण्यास टप्प्याटप्प्याने सुरुवात झाली आहे. या बसचे मार्गिकेवरून संचलन सुरू असताना बसथांब्याची ध्वनिक्षेपकाद्वारे पूर्वसूचना देणारी प्रणाली, दिवसा आणि रात्री दूरवरून दिसेल अशा बसच्या दर्शनी भागावर डिजिटल पाट्या, ई तिकीट, ज्येष्ठ आणि महिलांसाठी विशेष सुविधा, मार्गिकांचा विस्तार, नवीन मार्गिका, बसची वेगमर्यादा, प्रवाशांच्या सूचना- तक्रारींचे निराकरण, तातडीची सेवा आदींबाबत नियोजन सुरू केले आहे,' अशी माहिती पीएमपीच्या संचलन विभागाचे मुख्य वाहतूक व्यवस्थापक सतीश गव्हाणे यांनी दिली.

**प्रत्येक आगारासाठी पालक अधिकारी**

पीएमपीचे एकूण १७ आगार असून, प्रत्येक आगाराच्या ठिकाणी 'पालक अधिकारी' म्हणून नेमणूक केली आहे. या पालक अधिकाऱ्यांनी मार्गिकांवरील स्थानके आणि थांब्यांची सुधारणा, फलक आणि संचलनादरम्यान वाहक, चालकांकडून पाळण्यात येणारी शिस्त आदींचे स्वत: बसमधून प्रवास करून पाहणीच्या नोंदी ठेवण्याच्या सूचना केल्या आहेत.



### बुधवारी 'पीएमपी'ने प्रवास

» पीएमपीच्या प्रत्येक आगार प्रमुखांसह व्यवस्थापन विभागातील प्रत्येक अधिकाऱ्यांना आठवड्यातून एक दिवस पीएमपीतून प्रवास करण्याबाबत परिपत्रक काढले आहे. मागील काळातही अनेक संचालक, व्यवस्थापन विभागातील अधिकाऱ्यांनी असा प्रवास केला आहे. मात्र, नवीन परिपत्रकानुसार प्रत्येक अधिकाऱ्याच्या प्रवासाची नोंद ठेवण्यात येणार असून, उद्दिष्टपूर्तीबाबत सूचना अभिप्रायानुसार कामकाज केल्याचे मूल्यमापन करण्यात येणार आहे.

> 'पीएमपी'तून प्रवास करताना प्रवाशांच्या तक्रारी आणि सूचना जाणून घेऊन त्यावर उपाययोजना करण्यात येत आहे. सेवांमध्ये नक्कीच आणखी सुधारणा होतील. येत्या तीन महिन्यात प्रवासी संख्या १५ लाखांपर्यंत झालेली असेल.
>
> **- दीपा मुधोळ-मुंडे, अध्यक्षा तथा व्यवस्थापकीय संचालक, पीएमपीएमएल.**

# ‘त्यांच्या’वर फसवणुकीचा गुन्हा दाखल करा

## पुररेषेतील बांधकामप्रकरणी सर्व बीट निरीक्षकांची मालमत्ता तपासावी; राष्ट्रवादी काँग्रेसची (शरद पवार) लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिखली येथील इंद्रायणी नदीच्या निळ्या पूररेषेतील अनधिकृत बांधकामांना कारणीभूत ठरलेल्या विकसक, स्थानिक नेते आणि बीट निरीक्षक यांच्याविरुद्ध फसवणूक व फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसकडून (शरद पवार) करण्यात आली आहे. तसेच, महापालिकेच्या सर्व बीट निरीक्षकांच्या मालमत्तांचीही चौकशीची मागणी त्यांनी केली आहे.

यासंदर्भात राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) शहर उपाध्यक्ष धम्मराज साळवे यांनी महापालिका आयुक्त व लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला निवेदन दिले आहे. त्यांनी म्हटले आहे की, इंद्रायणी नदीच्या निळ्या पूररेषेत सुमारे ७ हजार २४५ चौरस मीटर क्षेत्रफळावर ३६ अनधिकृत बंगले उभारण्यात आले होते. ही बांधकामे पूर्णपणे बेकायदेशीर असल्याने न्यायालयाच्या आदेशाने या बंगल्यावर महापालिकेने निष्कासनाची कारवाई केली. या प्रकरणात केवळ निष्कासन करून प्रशासनाची जबाबदारी संपत नाही. या प्रकारामध्ये नागरिकांची जी फसवणूक झाली आहे. त्यामुळे संबंधित विकसक, स्थानिक नेते व बीट निरीक्षक यांच्याविरुद्ध फसवणूक, बनावट कागदपत्र तयार करणे व शासकीय जबाबदारी झटकण्याबाबत फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा.

महापालिकेच्या सर्व बीट निरीक्षकांची मालमत्ता व आर्थिक व्यवहारांची स्वतंत्र व सखोल चौकशी व्हावी. भविष्यात अशा प्रकारचे अनधिकृत बांधकामे होऊ नयेत. यासाठी जबाबदारी निश्चित करावी. , नागरिकांनी मालमत्ता खरेदी करताना पूररेषा, झोनिंग, आरक्षण इ. बाबींची माहिती महापालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात यावी. तसेच सदर प्रकरणात नागरिकांची फसवणूक झाली असून, याला कारणीभूत असलेल्या सर्व संबंधितांवर योग्य ती कायदेशीर व शिस्तभंगाची कारवाई करणे अत्यावश्यक आहे. अन्यथा यासारख्या घटनांची पुनरावृत्ती होण्याची शक्यता नाकारता येत नाही. महापालिका आयुक्तांनी सदर प्रकरणात निष्पक्ष, पारदर्शक व कठोर भूमिका घेईल, अशी मागणी साळवे यांनी केली आहे.



### या आहेत मागण्या...

» संबंधित विकसक, स्थानिक नेते व बीट निरीक्षक यांच्याविरुद्ध फसवणूक, बनावट कागदपत्र तयार करणे व शासकीय जबाबदारी झटकण्याबाबत फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा. शहरातील सर्व बीट निरीक्षकांची मालमत्ता व आर्थिक व्यवहारांची स्वतंत्र व सखोल चौकशी करण्यात यावी. भविष्यात अशा प्रकारचे अनधिकृत बांधकामे होऊ नयेत म्हणून सतत निगराणी यंत्रणा व अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करणारी कार्यपद्धती तयार करण्यात यावी. नागरिकांनी मालमत्ता खरेदी करताना पूररेषा, झोनिंग, आरक्षण इत्यादी बाबी तपासू शकतील, यासाठी महापालिकेच्या संकेतस्थळावर पारदर्शक माहिती उपलब्ध करून देण्यात यावी.इंद्रायणी नदीच्या परिसराजवळ पर्यावरणाला झालेल्या हानीचे मूल्यांकन करून, जबाबदार व्यक्तींवर पर्यावरण संरक्षण कायद्यांतर्गत दंडात्मक कारवाई करण्यात यावी.

### विकसक आणि स्थानिक नेत्यांची जबाबदारी

» संबंधित विकसकांनी नदीपात्रालगत असलेल्या निळ्या पूररेषेतील जागेवर प्लॉटिंग करून ती विक्री केली, तसेच नागरिकांना बनावट कागदपत्रे देऊन त्यांची दिशाभूल व आर्थिक फसवणूक केली आहे. यामध्ये काही स्थानिक नेत्यांचेही हात असल्याचा संशय आहे. हे गुन्हे भारतीय दंड संहितेच्या कलम ४२० (फसवणूक), ४६८ (खोटी कागदपत्रे तयार करणे), १२०(ब) (कट षडयंत्र) अंतर्गत येतात.

### बीट निरीक्षकांचा बेजबाबदारपणा

» संबंधित बीट निरीक्षक व अतिक्रमण विभागातील अधिकाऱ्यांनी बांधकाम होत असतानाच ते थांबवण्याची जबाबदारी पार पाडली नाही. उलट नागरिकांना बेकायदेशीर बांधकामाला प्रोत्साहन दिल्याचे माध्यमांतून स्पष्ट झाले आहे. यावरून स्पष्ट होते की, त्यांनी दायित्वाचे उल्लंघन करून गैरव्यवहार केला आहे. यामुळेच सदर कारवाईमुळे संबंधित बांधकामधारकांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले असून, त्यांना मानसिक व शारीरिक त्रास सहन करावा लागत आहे.

# रोजगार हमी योजनेतील कामांना मिळणार गती

## आराखडा इंग्रजी भाषेत असून मराठी भाषा सोयीस्करपणे टाळली असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विकासकामांना चालना देण्याच्या उद्देशाने विधानभवन, मुंबई येथे आमदार सुनील शेळके यांच्या अध्यक्षतेखाली रोजगार हमी योजना समितीची पहिली आढावा बैठक पार पडली. यामध्ये राज्यभरातील कामांचा सखोल आढावा घेऊन प्रलंबित निधी मिळवण्यासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करण्याचा निर्णय घेण्यात आला.

या समितीमध्ये अध्यक्ष आमदार सुनील शेळके यांच्यासह एकूण २५ आमदारांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. समितीच्या कार्यक्षेत्रात सध्या २६६ कामांचा समावेश असून त्यांचे अ, ब, क, ड अशा चार वर्गांमध्ये वर्गीकरण करण्यात आले आहे. यामध्ये सिंचन विहिरी, फळबाग लागवड, पानंद व शिवरस्त्यांची सुधारणा ही कामे प्राधान्याने करण्यात येतात.

बैठकीत महाराष्ट्र राज्यात योजनेअंतर्गत यापूर्वी करण्यात आलेल्या कामांचा जिल्हानिहाय आढावा घेण्यात आला. यामध्ये सुरू असलेली, प्रलंबित असलेली व पूर्ण झालेल्या कामांची देयके यासह विविध मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच आगामी काळात समितीच्या माध्यमातून नव्याने हाती घेतल्या जाणाऱ्या प्रकल्पांची रूपरेषा ठरवण्यात आली.

योजनेच्या माध्यमातून विकासकामांसोबतच ग्रामीण भागातील सर्वसामान्य कुटुंबांना रोजगाराच्या माध्यमातून लाभ मिळावा, हेच या समितीचे मुख्य उद्दिष्ट असल्याचे आमदार शेळके यांनी यावेळी स्पष्ट केले. तसेच योजनेच्या अंमलबजावणीबाबत संपूर्ण महाराष्ट्राचा दौरा नियोजित करण्यात येणार असल्याचेही त्यांनी जाहीर केले

या बैठकीस समिती सदस्य आमदार शंकर मांडेकर, योगेश टिळेकर, अमोल जावळे, विनोद अग्रवाल, राजेश वानखेडे, शांताराम मोरे, हिकम्मत उढाण, काशिनाथ दाते, संजय देरकर, नितीन देशमुख, शिरीषकुमार नाईक, बापूसाहेब पठारे, किरण सरनाईक, सुधाकर अडवाले यांच्यासह सचिव, आयुक्त, मिशन महासंचालक, सहाय्यक संचालक, उपसचिव व इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



### तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना

» योजना राबविताना येणाऱ्या अडचणी, निधीची कमतरता आणि इतर प्रश्न यावर मात करण्यासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करून प्रलंबित देयके मिळवण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचे ठरले. सदस्य आमदारांनी बैठकीत आपापल्या भागातील अडचणी आणि प्रश्न मांडले असता, त्यावर तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

# शिरूर तालुक्यात महिला मंडल अधिकाऱ्याला धमकी

## भानुदास खामकर यांच्यावर कठोर कारवाईची मागणी; दोन दिवसांत अटक न झाल्यास आंदोलनाचा इशारा

**पुणे | प्रतिनिधी**

शिरूर तालुक्यातील मलठण येथे कार्यरत महिला मंडल अधिकारी माधुरी वसंत बागले यांना भानुदास खामकर यांनी फोनद्वारे अश्लील भाषेत शिवीगाळ करत धमकी दिल्याच्या घटनेने महसूल प्रशासनात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी महाराष्ट्र राज्य तलाठी संघटनेने आक्रमक पवित्रा घेत संबंधित व्यक्तीवर तात्काळ कठोर कायदेशीर कारवाईची मागणी केली आहे. दोन दिवसांत गुन्हा दाखल करून खामकर यांना अटक न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा संघटनेने दिला आहे.

दीड वर्षांपूर्वी त्यांच्याकडे टाकळी हाजी मंडळाचा अतिरिक्त कार्यभार होता. त्या काळात शिनगरवाडी (ता. हाजी) येथील खातेदार भानुदास खामकर यांच्या रस्ता खुला करण्याच्या अर्जावर तत्कालीन तहसीलदारांच्या आदेशानुसार कारवाई करत रस्ता खुला करण्यात आला होता. मात्र, खामकर यांनी बागले यांना फोनवर संपर्क करून या प्रकरणावरून अश्लील आणि लज्जास्पद भाषेत शिवीगाळ केली. इतकेच नव्हे, तर "तुला बघून घेईन" अशी थेट धमकी दिली.

ही घटना केवळ एका महिला अधिकाऱ्याच्या प्रतिष्ठेला धक्का देणारी नसून, महसूल प्रशासनातील महिला कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण करणारी आहे. तलाठी संघटनेने या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त करत अशा वर्तनामुळे प्रशासकीय यंत्रणेतील कार्यक्षम अधिकाऱ्यांचे मनोबल खच्ची होते, असे म्हटले आहे. या घटनेच्या निषेधार्थ तलाठी संघटनेने शिरूरचे तहसीलदार बाळासाहेब मस्के यांना निवेदन सादर केले. निवेदनात भानुदास खामकर यांच्यावर दोन दिवसांत गुन्हा दाखल करून अटक करण्याची मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, या प्रकरणाने महसूल कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आणला आहे. वाढत्या दबाव आणि दहशत निर्माण करणाऱ्या घटनांमुळे अधिकाऱ्यांचे काम अडथळ्यात येत आहे. प्रशासनाने यावर ठोस भूमिका न घेतल्यास अशा घटनांची पुनरावृत्ती होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. आता प्रशासन काय पावले उचलते, खामकर यांच्यावर कोणती कारवाई होते आणि कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी कोणत्या उपाययोजना केल्या जातात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



### महिला कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न

» ही घटना केवळ एका महिला अधिकाऱ्याच्या प्रतिष्ठेला धक्का देणारी नसून, महसूल प्रशासनातील महिला कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण करणारी आहे. तलाठी संघटनेने या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त करत अशा वर्तनामुळे प्रशासकीय यंत्रणेतील कार्यक्षम अधिकाऱ्यांचे मनोबल खच्ची होते, असे म्हटले आहे. भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी कठोर कायदेशीर कारवाई आवश्यक असल्याचे संघटनेने नमूद केले आहे.

### तहसीलदारांना निवेदन

» या घटनेच्या निषेधार्थ तलाठी संघटनेने शिरूरचे तहसीलदार बाळासाहेब मस्के यांना निवेदन सादर केले. निवेदनात भानुदास खामकर यांच्यावर दोन दिवसांत गुन्हा दाखल करून अटक करण्याची मागणी करण्यात आली आहे. यावेळी ग्राममहसूल अधिकारी आबासाहेब मोरे, ए.ए. जोरी, मनीषा राऊत, अनिता भालेराव, अनुष्का घुगे, आर.टी. घोडे, के.डी. माने, शलाका भालेराव, वाय.एस. टिळेकर, दिपाली नवले, जे.डी. धुरंदर, आर.जी. अरदवाड, आर.पी. जाधव, मंडल अधिकारी नंदकुमार खरात, कपिल बोडरे, अशोक बडेकर, सिद्धार्थ वाघमारे, आदित्य गायकवाड, सतीश पलांडे, दीपक मोरे, विकास फुके आदी कर्मचारी उपस्थित होते.

### काय आहे प्रकरण?

» माधुरी बागले या सध्या मलठण येथे मंडल अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. दीड वर्षांपूर्वी त्यांच्याकडे टाकळी हाजी मंडळाचा अतिरिक्त कार्यभार होता. त्या काळात शिनगरवाडी (ता. हाजी) येथील खातेदार भानुदास खामकर यांच्या रस्ता खुला करण्याच्या अर्जावर तत्कालीन तहसीलदारांच्या आदेशानुसार कारवाई करत रस्ता खुला करण्यात आला होता. मात्र, 20 मे 2025 रोजी दुपारी 1:30 वाजता खामकर यांनी बागले यांना फोनवर संपर्क करून या प्रकरणावरून अश्लील आणि लज्जास्पद भाषेत शिवीगाळ केली. इतकेच नव्हे, तर "तुला बघून घेईन" अशी थेट धमकी दिली.

# नसरापूरात स्मशानभूमी, बंधाऱ्यातील गाळ काढण्याच्या कामाचा शुभारंभ; नाम फाउंडेशनचा पुढाकार

## नसरापूर ग्रामपंचायतीच्या विशेष पुढाकाराने आणि "नाम फाउंडेशन"च्या सहकार्याने कामाचा शुभारंभ करण्यात आला.

**पुणे | प्रतिनिधी**

नसरापूर ग्रामपंचायतीच्या विशेष पुढाकाराने आणि "नाम फाउंडेशन"च्या सहकार्याने स्मशानभूमी व बनेश्वर येथील बंधाऱ्यातील गाळ काढण्याच्या कामाचा शुभारंभ आज, गुरुवारी (दि. 22) सकाळी 10:30 वाजता करण्यात आला.

"नाम फाउंडेशन"तर्फे जलसंधारण, पर्यावरण संवर्धन आणि ग्रामीण विकासासाठी राज्यभरात विविध उपक्रम राबवले जात असून, नसरापूरमधील हा उपक्रम त्याचाच एक भाग आहे. या कामामुळे स्मशानभूमी परिसरात सौंदर्य आणि स्वच्छता वाढणार आहे. तसेच, नदीतील गाळ काढल्याने पाणी साठवण क्षमता वाढणार असून, नदीचा प्रवाह सुरळीत होईल. याचा थेट फायदा शेतकऱ्यांना पाण्याची उपलब्धता सुधारण्यात होणार आहे.

या उपक्रमाद्वारे नदीपात्रातील प्लास्टिक आणि घातक कचऱ्याची स्वच्छता केली जाणार आहे. यामुळे पर्यावरणाच्या दृष्टिकोनातून हा उपक्रम अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे. नदीच्या स्वच्छतेमुळे गावातील पर्यावरण संतुलन राखण्यास मदत होईल आणि शेतीसाठी पाण्याची उपलब्धता वाढेल. नसरापूर गावाने उचललेले हे पाऊल इतर गावांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे. गावाचा हरवलेला निसर्गसन्मान पुन्हा प्राप्त करण्याच्या दिशेने हा उपक्रम एक सकारात्मक टप्पा ठरेल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.




### ग्रामस्थांचा उत्साह

» या शुभारंभ प्रसंगी सरपंच उषा विक्रम कदम, उपसरपंच नामदेव आत्माराम चव्हाण, सदस्य गणेश दळवी, इरफान मुलानी, माजी सदस्य बाबू झोरे यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, पदाधिकारी, पत्रकार, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी या उपक्रमाचे स्वागत करत नसरापूरच्या या पुढाकाराला प्रेरणादायी ठरवले.

### प्रेरणादायी पाऊल

» नसरापूर गावाने उचललेले हे पाऊल इतर गावांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे. गावाचा हरवलेला निसर्गसन्मान पुन्हा प्राप्त करण्याच्या दिशेने हा उपक्रम एक सकारात्मक टप्पा ठरेल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे. "नाम फाउंडेशन" आणि ग्रामपंचायतीच्या या संयुक्त प्रयत्नांमुळे नसरापूर गाव पर्यावरण संवर्धन आणि जलसंधारणाच्या क्षेत्रात एक आदर्श निर्माण करत आहे.